Success Key Test Series	**SUCCESS KEY TEST SERIES** X- Semi English **(Unit Test-3 Marathi (semi) Ch- 11 to 15)** मराठी -	DATE: TIME१ तास ३० मी MARKS: 40 SEAT NO:

विभाग १ - गदय

प्र. १ उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)

A1) i) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. 1

1) सगळीकडे उजाडलं आणि रेल्वेचे ..... तिथे आले.
अ. मंत्री ब. सफाई कामगार क. आधिकारी ड. कर्मचारी

2) अरुणिमाकडे ..... तिकिट नव्हतं.
अ. नाटकाचं ब. सिनेमाचं क. प्रवासाचं ड. बसचं

ii) चौकटी पूर्ण करा. 1

1) अरुणिमाच्या खेळाचा स्तर

2) दिल्लीतील प्रसिद्ध हॉस्पीटल

त्या रात्री तब्बल सात तास, रेल्वेच्या धावपट्टीवर मदतीची याचना करत मी पडून राहिले. आश्चर्य म्हणजे माझी शुद्ध हरपली नव्हती आणि मेंदू पूर्ण तल्लखपणे तेथून सुटकेचा विचार करत होता. सगळीकडे उजाडलं आणि रेल्वे चे सफाई कामगार तिथे आले. हादरलेच ते मला तशा अवस्थेत पाहून. त्यांनी मला बरेली गावातील हॉस्पिटलमध्ये दाखल केलं आणि सुरू झाले दुर्दैवाचे दशावतार.

बरेलीच्या त्या हॉस्पिटलमध्ये ना भूलतज्ज्ञ होता ना मला देण्यासाठी पुरेसे रक्त. सचिंत झालेल्या डॉक्टर व सहकाऱ्यांना मीच धीर दिला, 'डॉक्टर, नाही तरी माझ्या पायाची चाळण झालेलीच आहे. आता भूल न देताच तुम्ही तो कापलात तरी चालेल.' डॉक्ट र व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वत:चे एक युनिट रक्त मला दिले आणि माझ्यादेखतच माझा पाय कापला गेला.

इकडे मी जीवनमरणाच्या सीमारेषेवर होते; पण हॉस्पिटलबाहेरच्या जगात एक वेगळेच नाट्य घडत होते. 'फुटबॉल आणि व्हॉ लीबॉल चॅम्पियन युवती सात तास जखमी अवस्थेत उपचाराविना पडून राहिली' ही बातमी प्रसारमाध्यमांनी उचलून धरलेली. तत्का लीन क्रीडामंत्र्यांनी मला दिल्लीच्या 'एम्स'मध्ये (AIIMS) हलवले, राष्ट्रीय खेळाडू असल्याने अत्युच्च दर्जाच्या सुविधा मला मिळाल्या...पण...पण शल्य एकच होतं, की प्रसारमाध्यमांमध्ये वाटेल त्या वावड्या उठत होत्या. 'अरुणि माकडे प्रवासाचं तिकीट नव्हतं म्हणून तिने रेल्वे तून खाली उडी मारली' इथपासून ते 'अरुणिमाने आत्महत्येचा प्रयत्न केला', इथपर्यंत काहीही छापून येत होतं. तब्बल चार महिने 'एम्स'मध्ये (AIIMS) राहिल्यानंतर, शारीरिक जखमांवर मलमपट्टी झाली होती; पण या मानसिक जखमांचे घाव अंतरंग घायाळ करणारे होते. मी नि माझं ढालीप्रमाणं रक्षण करणारं कुटुंब-आम्ही सत्य परिस्थिती ओरडून सांगत होतो; पण ती ऐकण्यासाठी ना कुणाला वेळ होता ना रस.

A2) i) एका वाक्यात उत्तर लिहा. 1

डॉक्टरांना अरुणिमाने कोणता धीर दिला?

ii) कोण ते लिहा. 1

1) डॉक्टर व सहकाऱ्यांना धीर देणारी

2) अरुणिमाला हॉस्पिटलमध्ये दाखल करणारे

A3) i) समानार्थी शब्द लिहा. 1

1) शल्य - .....

2) कुटुंब - .....

ii) लेखन नियमांनुसार अचूक शब्द ओळखा. 1

1) अ. युवति ब. यूवती क. युवती ड. यूवति

2) अ. कुटुंब ब. कुंटुंब क. कूटुंब ड. कुंटूंब

A4) स्वमत 2

'मानसिक वेदना घायाळ करणाऱ्या असतात' हे विधान तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

विभाग २ - पदय

प्र. २ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)

A1) आकृतिबंध पूर्ण करा. 2



सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रिकमळीं दडो; मुरडितां हटानें अडो;
वियोग घडतां रडो; मन भवच्चरित्रीं जडो ।।

न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गीं वळो;।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हां न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ।।

मुखीं हरि! वसो तुझी कुशलधामनामावली,
क्षणांत पुरवील जी सकलकामना मावली; ।
कृपा करिशि तूं जगत्रयनिवास दासावरी,
तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी ।।

A2) i) सूचनेनुसार कृती करा. 1

'स्वतत्त्व' उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

ii) प्रतिशब्द उताऱ्यातून शोधा. 1

1) अहंकार - .....

2) पाप - .....

A3) काव्य सौंदर्य लिहा 2

दुरित आत्मबोधे जळो.

A4) काव्यसौंदर्य. 2

सुसंगती सदा घडो. या विचाराचा विस्तार करा.

(आ) प्रस्तुत कवितेचे पुढील कृतिनिहाय रसग्रहण करा **(4)**

वस्तू कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – (०१ गुण)
२) कवितेचा रचनाप्रकार - (०१ गुण)
३) कवितेचा काव्यसंग्रह - (०१ गुण)
४) कवितेचा विषय (स्थायी भाव) - (०१ गुण)
५) कवितेच्या कवयित्रिंची लेखन वैशिष्ट्ये - (०२ गुण)
६) कवितेची मध्यवर्ती कल्पना - (०२ गुण)

विभाग ३ - स्ठ्लवाचन

प्र. ३ खालील कोणत्याही एक कृती सोडवा. **(3)**

1) पतिनिधनानंतर आपण सैन्यात भरती व्हायचं.' स्वाती महाडिक यांच्या या निर्धारातून समाजाला काय संदेश मिळतो, ते तुमच्या शब्दांत लिहा.

2) देशप्रेमी कर्नल संतोष महाडीक.

विभाग ४ - भाषा अध्यन (व्याकरण)

प्र. ४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.

(१) समास - **(2)**

खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

सामासिक शब्द	विग्रह	समास
i) चंद्रामृत	.....	.....
ii) भवसागर	.....	.....

(२) वाक्यप्रचार - **(2)**

खालील पादीतील वाक्यप्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरुन वाक्ये पुन्हा लिहा.

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
तमा नसणे →

(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.

1) शब्दसंपत्त्ती - **(2)**

i. 'अव' उपसर्ग लावून तयार होणारे दोन शब्द लिहा.
ii. खालील शब्दांना योग्य प्रत्यय लावून शब्द तयार करा.
अ. लढा - ..... ब. नवल - .....

2) विरामचिन्हांचा योग्य वापर करा. **(1)**

'पडता पडता किती कटकट करतोयस तू! तुझ्या या दंग्यानं माझ्या सा-या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला की?'

विभाग ५ - उपयोजित लेखन

प्र. ५ (1) खालील विषयावर पत्र लिहा. **(5)**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.



(2) बातमी लेखन **(5)**

के / पी (पश्चिम) विभाग आयोजित
राज्यस्तरीत विज्ञान प्रदर्शन विवेक विद्यालय - गोरेगाव
शाळेच्या प्रांगणात उद्घाटक व प्रमुख पाहुणे:
श्रीमती विद्या ठाकूर
दिनांक २ डिसेंबर
प्रदर्शन सर्वांसाठी
सकाळी ८.०० ते सायं ६.०० वाजेपर्यंत खुले राहणार